सकाळ

# चांदवड नगर परिषद, चांदवड

## 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५'

## 'अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचना सेवा देणेबाबत'

## जाहीर सूचना

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते, की लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे सेवांची यादी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क २०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास नगर परिषदेस ज्या सेवा लागू आहेत त्या आवश्यक सेवा चांदवड नगर परिषदेकडून लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगर परिषदेतर्फे पद निर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या आणि नगर परिषदेस लागू असलेल्या सेवांची यादी चांदवड नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सही/-

**(दिनेश सिनारे)**

**मुख्याधिकारी**

**चांदवड नगर परिषद, चांदवड**